# एसंशिं, युटी आता 'फुकटचा बाबुराव' भर सभेत एकनाथ शिंदेंची तुफान टोलेबाजी



| वर्ष - 8 | अंक - 257 | UDYAM-MH-26-0158827 |

महाईन्यूज ™

## आतील पानांत

- दिल्लीचा सलग चौथा विजय!
- रनआऊटचं खापर विराटच्या डोक्यावर
- मला लहानपणी पूनम म्हणायचे!
- धमक्या, ब्लॅकमेलनी चीन बधणारा नाही

www.mahaenews.com | शुक्रवार, दि. 11 एप्रिल 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## 26/11 मुंबई हल्ल्याचा सूत्रधार अखेर ताब्यात

# दहशतवादाला सुरुंग, भारताच्या जाळ्यात तहव्वूर!

## तहव्वुर राणाला तिहार तुरुंगात ठेवण्याची तयारी




**। नवी दिल्ली । प्रतिनिधी । महाईन्यूज**

**मुंबईवरील २६/११ च्या दहशतवादी हल्ल्याचा सूत्रधार असलेला तहव्वूर राणाला भारतात आणले जात आहे. अमेरिकेकडून त्याच्या प्रत्यार्पणाला हिरवा सिग्नल मिळाल्यानंतर भारतीय पथक अमेरिकेत दाखल झाले होते. भारतात आणल्यानंतर राष्ट्रीय तपास यंत्रणांकडून त्याची चौकशी केली जाईल आणि नंतर त्याला न्यायालयात सादर केले जाईल.**

पटियाला हाऊस कोर्टाबाहेर कडक सुरक्षा व्यवस्था मुंबई दहशतवादी हल्ल्यातील आरोपी तहव्वुर राणाला अमेरिकेतून प्रत्यार्पण केल्यानंतर एनआयएच्या विशेष न्यायालयात हजर केले जाणार आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी न्यायालय परिसरात सीआयएसएफसह निमलष्करी दलांचे जवान तैनात करण्यात आले आहेत.

राणाला तिहार तुरुंगात ठेवले जाणार तहव्वुर राणाला तिहार तुरुंग ठेवले जाणार आहे. तुरुंग अधिकाऱ्यांनी सांगितले की, राणाला तुरुंगात उच्च सुरक्षा वॉर्डमध्ये ठेवण्यासाठी सर्व तयारी करण्यात आली आहे. राणावर डेव्हिड कोलमन हेडली, लष्कर-ए-तैयबा (एलईटी), हरकत-उल-जिहादी इस्लामी (एचयूजी) आणि इतर पाकिस्तानी दहशतवाद्यांच्या मदतीने 2008 च्या मुंबई दहशतवादी हल्ल्याचा कट रचल्याचा आरोप आहे.

### विशेष एनआयए न्यायालयात खटला चालणार

दिल्लीतील विशेष एनआयए न्यायालयात खटला चालवला जाणार आहे. आता या प्रकरणाची सुनावणी दिल्लीत होणार असल्याने, राणाला मुंबईत पाठवले जाणार नाही. या हाय-प्रोफाइल प्रकरणात भारताच्या वतीने वरिष्ठ वकील दयान कृष्णन हे खटला चालवतील. त्यांच्यासोबत विशेष सरकारी वकील (एसपीपी) नरेंद्र मान हे कायदेशीर कार्यवाहीचे नेतृत्व करतील.

पाकिस्तानने हात झटकले तहव्वुर राणाच्या प्रत्यार्पणानंतर त्याच्याशी आपला काहीही संबंध नसल्याचे पाकिस्तानने गुरुवारी स्पष्ट केले. पाकिस्तानने म्हटले की, तहव्वुर राणा हा कॅनेडियन नागरिक आहे. त्याने जवळजवळ दोन दशकांपासून त्याचे पाकिस्तानी कागदपत्रे अपडेट केलेली नाहीत.

### कोण आहे तहव्वूर राणा?

तहव्वूर राणा हा पाकिस्तानी-कॅनेडियन नागरिक असून, त्याला अमेरिकेत बंदी घातलेल्या दहशतवादी संघटने लष्कर-ए-तैयबाचे काम केल्याबद्दल आणि २६ ते २९ नोव्हेंबर २००८ दरम्यान मुंबईत झालेल्या दहशतवादी हल्ल्यांसाठी लष्कर-ए-तैयबाला मदत केल्याबद्दल दोषी ठरवण्यात आले होते.दरम्यान मुंबई दहशतवादी हल्ल्यात सुरक्षा दल, नागरिक आणि परदेशी पर्यटकांसह १७४ हून अधिक लोकांचा बळी गेला होता.

### उदाहरण अमोल मिटकरींचे बघा..

मुंबईत २००८ मध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील आरोपी तहव्वूर हुसेन राणा याला अमेरिकेतून भारतात आणल्यानंतर काँग्रेस आणि भाजपामध्ये श्रेयवाद सुरू झाला आहे. तहव्वूर राणाला भारतात आणल्याचे श्रेय घेतल्याबद्दल काँग्रेस नेते पी. चिदंबरम यांनी गुरुवारी मोदी सरकारवर टीका केली आणि म्हटले की, हे "यूपीए सरकारच्या काळात या प्रकरणी केलेल्या कामाचे परिणाम आहेत. तहव्वूर राणाच्या प्रत्यार्पणावर बोलताना चिदंबरम म्हणाले की, "मी हे स्पष्ट करतो की, मोदी सरकारने ही प्रक्रिया सुरू केली नाही किंवा त्यांना यामध्ये कोणताही नवीन यश मिळाले नाही. त्यांना फक्त यूपीएच्या काळात सुरू झालेल्या परिपक्व, सातत्यपूर्ण आणि धोरणात्मक राजनैतिकतेचा फायदा झाला. हे प्रत्यार्पण कोणत्याही दिखाव्याचा परिणाम नाही, तर राजनैतिकता, कायदा अंमलबजावणी आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य प्रामाणिकपणे आणि कोणत्याही प्रकारे छाती न ठोकता केले तर भारतीय राज्य काय साध्य करू शकते याचा हा पुरावा आहे

# नवउद्यमी हेच आर्थिक आव्हानांवरील उत्तर!

## सांस्कृतिक कार्य, माहिती-तंत्रज्ञानमंत्री आशिष शेलार यांचे मत

। पुणे ।महाईन्यूज ।
प्रतिनिधी।

**'काही देश प्रचंड करवाढ लागू करत आहेत. त्याचा फटका भारतालाही बसत आहे. जगातील तिसरी आर्थिक महासत्ता होताना अशा आव्हानांवर नवउद्यमी, नवसंकल्पना हेच उत्तर आहे,' अशी भूमिका राज्याचे सांस्कृतिक कार्य, माहिती तंत्रज्ञानमंत्री ॲड. आशिष शेलार यांनी मांडली.**




डेस्टिनेशन को वर्किंग, पुणे बिझनेस ॲंड इन्फ्रास्ट्रक्चर ग्रुप, टीडीटीएल, एमआयटी विश्वशांती विद्यापीठ यांच्यातर्फे आयोजित 'पुणे स्टार्टअप एक्स्पो'मध्ये ॲड. शेलार बोलत होते. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. राहुल कराड, कुलगुरू डॉ. रवीकुमार चिटणीस, अधिष्ठाता डॉ. सिद्धार्थ चक्रवर्ती, एक्स्पोच्या आयोजक अमृता देवगावकर, मंदार देवगावकर, डेटा टेकचे संचालक अमित आंद्रे या वेळी उपस्थित होते. सर्वोत्तम ठरलेल्या २४ नवउद्यमींना पारितोषिक देऊन गौरवण्यात आले. ॲड. शेलार म्हणाले, 'पूर्वीच्या काळात नवसंकल्पना केवळ सत्ताधाऱ्यांच्या जवळच्या कुटुंबांपुरत्या मर्यादित होत्या. मात्र, आता परिस्थिती बदलली आहे. नवसंकल्पना, नवउद्यमी तळागाळात पोहोचत आहेत. २०४७पर्यंत विकसित भारताचे पंतप्रधानांचे उद्दिष्ट आहे. त्यासाठी आधी जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था व्हावी लागेल. काही देश कर वाढवत आहेत. भारताला ते सहन करावे लागत आहे. मात्र, या परिस्थितीला नवउद्यमी, नवसंकल्पना हेच उत्तर असणार आहे.

शहरी आणि ग्रामीण भागातील युवांच्या नवकल्पनांना व्यासपीठ आणि गुंतवणूकदार मिळाले पाहिजेत.'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील नवसंकल्पनेला चालना दिली. नवउद्यमींसाठी नवउद्यमी धोरण आणले. त्यामुळे भारत नवउद्यमींमध्ये जगात आघाडीवर आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाद्वारे शिक्षण व्यवस्था बदलत आहे. मातृभाषेतून शिक्षणावर भर देण्यात आला आहे. नवउद्यमी बाजारपेठेत येत नाही, तोपर्यंत तो छंद राहतो. नवउद्यमींच्या माध्यमातून रोजगारनिर्मिती करणे, मानसिकता बदलणे गरजेचे आहे,' असे पाटील यांनी नमूद केले.'पुण्याची 'पूर्वेकडील ऑक्सफर्ड' अशी ओळख आहेच.

### नवसंकल्पनेला चालना दिली

आधी जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था व्हावी लागेल. काही देश कर वाढवत आहेत. भारताला ते सहन करावे लागत आहे. मात्र, या परिस्थितीला नवउद्यमी, नवसंकल्पना हेच उत्तर असणार आहे. शहरी आणि ग्रामीण भागातील युवांच्या नवकल्पनांना व्यासपीठ आणि गुंतवणूकदार मिळाले पाहिजेत.'पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील नवसंकल्पनेला चालना दिली.

मात्र, आता 'पूर्वेकडील सिलिकॉन व्हॅली' अशीही पुण्याची जागतिक स्तरावर ओळख झाली आहे. पुण्याची स्वतःची अशी क्षमता आहे.

अनेक शिक्षण संस्था, शिक्षणतज्ज्ञ, माहिती-तंत्रज्ञान कंपन्या, एमएसएमईज, नवउद्यमी परिसंस्था पुण्यात आहेत. पुण्याच्या विकासासाठी अधिक चांगली धोरणे सरकार करत आहे,' असेही ॲड. शेलार यांनी नमूद केले.डेस्टिनेशन को वर्किंग, पुणे बिझनेस ॲंड इन्फ्रास्ट्रक्चर ग्रुप, टीडीटीएल, एमआयटी विश्वशांती विद्यापीठ यांच्यातर्फे आयोजित 'पुणे स्टार्टअप एक्स्पो'मध्ये ॲड. शेलार बोलत होते. उच्च व तंत्रशिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, एमआयटी विश्वशांती विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. राहुल कराड, कुलगुरू डॉ. रवीकुमार चिटणीस, अधिष्ठाता डॉ. सिद्धार्थ चक्रवर्ती, एक्स्पोच्या आयोजक अमृता देवगावकर, मंदार देवगावकर, डेटा टेकचे संचालक अमित आंद्रे या वेळी उपस्थित होते. सर्वोत्तम ठरलेल्या २४ नवउद्यमींना पारितोषिक देऊन गौरवण्यात आले. ॲड. शेलार म्हणाले, 'पूर्वीच्या काळात नवसंकल्पना केवळ सत्ताधाऱ्यांच्या जवळच्या कुटुंबांपुरत्या मर्यादित होत्या. मात्र, आता परिस्थिती बदलली आहे. नवसंकल्पना, नवउद्यमी तळागाळात पोहोचत आहेत.

# जलसंपदाच्या बिलात पाच वर्षांत चारपटींनी वाढ

## महापालिका धरणांतून प्रत्यक्षात 18 ते 19 टीएमसी पाणी उचलते

। पुणे ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**गेल्या पाच वर्षांमध्ये नागरिकांची पाण्याची मागणी वाढत असल्याने जलसंपदा विभागाला देण्यात येणाऱ्या रकमेतही वाढ झाली आहे. या खर्चात गेल्या पाच वर्षांत चारपटींनी वाढ झाली आहे. २०२४-२५ मध्ये महापालिकेचा पाणी वापरासाठी जलसंपदा विभागाकडे २०२ कोटी रुपयांचा खर्च झाला आहे. चार वर्षांपूर्वी, २०२०-२१ पर्यंत महापालिका पाणीवापरासाठी ५० ते ५५ कोटी रुपयांचे बिल देत होती.**



शहराचा वाढता विस्तार आणि लोकसंख्येमुळे नागरिकांकडून पाण्याची मागणी वाढत आहे. नागरिकांची पाण्याची गरज भागविण्यासाठी महापालिका वेगवेगळ्या धरणांतून पाणी उचलते. या बदल्यात महापालिकेला जलसंपदा विभागाला बिल द्यावे लागते. महापालिकेने ठरवून दिलेल्या कोट्यापेक्षा अधिक पाणी घेतल्यास जलसंपदा विभाग औद्योगिक दराने शुल्क घेते. नागरिकांची पाण्याची मागणी वाढत असल्याने महापालिकेकडून बिलापोटी दिल्या जाणाऱ्या रकमेतही वाढ झाली आहे. महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाकडून केला जात आहे. गेल्या काही वर्षांमध्ये हा खर्च वाढत चालला असल्याने पाणीपुरवठा विभागाचे आर्थिक नियोजन कोलमडले आहे. महापालिकेला राज्य सरकारने २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी १४.६२ टीएमसी पाणीसाठा मंजूर केला आहे. मात्र, शहराची वाढती लोकसंख्या लक्षात घेऊन शहरातील प्रत्येक भागातील नागरिकांना पुरेशा दाबाने पाणी द्यायचे झाल्यास महापालिकेला वर्षाला २१ टीएमसी पाणी लागते. यापैकी महापालिका धरणांतून प्रत्यक्षात १८ ते १९ टीएमसी पाणी उचलते. ठरवून दिलेल्या मंजूर कोट्यापेक्षा जादा पाणी घेतल्याने जलसंपदा विभाग जलसंपत्ती नियामक प्राधिकरणाच्या आदेशानुसार महापालिकेकडून दीड ते तीनपट अधिक दर पाण्यासाठी घेतो.

### आर्थिक नियोजन कोलमडले

महापालिका उचलत असलेले वाढीव पाणी नागरिकांना पिण्यासाठी देत असताना जलसंपदा विभागाकडून प्रत्यक्षात या पाण्याचे १५ टक्के बिल हे औद्योगिक वापरासाठीच्या दराने लावले जात आहे. लोकसंख्येमुळे नागरिकांकडून पाण्याची मागणी वाढत आहे. नागरिकांची पाण्याची गरज भागविण्यासाठी महापालिका वेगवेगळ्या धरणांतून पाणी उचलते.

## विधानसभा उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल बनसोडे यांचा सत्कार

# विधानसभेच्या उपाध्यक्षांबरोबर माजी आमदारांचे वाभाडे!

### अजित पवारांनी माजी आमदारांना ‘पक्षनिष्ठे’वरून झाडले

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**राजकारणात ठाम भूमिका घेत एकनिष्ठ राहावे लागते. तुमचे सतत तळ्यात मळ्यात सुरू असते. असे केल्यामुळेच तुम्ही आजवर मागे राहिलात. अशा शब्दात उपमुख्यमंत्री तथा पुण्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी माजी आमदार विलास लांडे यांना भर व्यासपीठावरून चांगलेच झाडले. तर तुमच्या चिरंजीवाला जरा समजावून सांगा. घरातील व्यक्तीने चुकीचे कृत्य केल्यास स्वतःची, पक्षाची, सरकारची बदनामी होते, असा सल्ला विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांनाही दिला.**



विधानसभा उपाध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते बनसोडे यांचा सत्कार करण्यात आला. त्यावेळी अजित पवार बोलत होते. या सत्कार सोहळ्यासाठी माजी आमदार विलास लांडे सर्वात पुढे होते. आयोजनात पुढाकार घेणाऱ्या माजी आमदारांना मात्र अजित पवार यांनी चांगलेच सुनावले.

अजित पवार म्हणाले विधानसभा निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे भोसरीचे उमेदवार अजित गव्हाणे यांचा प्रचार करणारे माजी आमदार विलास लांडे नेमक्या कोणत्या पक्षात याबाबत लोक मला विचारतात. सर्वच म्हणतात लांडे आपलेच आहेत. सर्वपक्षीय राहिल्यामुळे त्यांना काहीच मिळत नाही. त्यामुळे काहीतरी भूमिका घ्यावी लागते. लांडे यांचे तळ्यातमळ्यात सुरू असते. एकनिष्ठ राहणारे बनसोडे कोठे गेले हे बघा, असे सांगत लांडे यांना एक भूमिका घेण्याची सूचना पवार यांनी केली.

### पक्षाची बदनामी होते

विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांच्या कौतुक करण्यात अजित पवार यांनी बनसोडे यांनाही चांगलेच छापले. “आता सकाळी लवकर कामाला लागा, लोकांना वेळ द्या, विधानसभेला वेळ द्यावा लागेल. जेवढं महत्त्वाचे पद, तेवढे जास्त कष्ट घ्यावे लागतात. तुमच्या चिरंजीवाला जरा समजावून सांगा. घरातील व्यक्तीने चुकीचे कृत्य केल्यास स्वतःची, पक्षाची, सरकारची बदनामी होते, असा सल्ला उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बनसोडे यांना दिला.

---

# आई नव्हे तू वैरीण! पोटच्या मुलाचा क्रूर छळ!

## आईवर गुन्हा दाखल; शिक्षिकेच्या सतर्कतमुळे प्रकार उघड

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**पोटच्या लहान मुलाला चटके देऊन, वरच्यावर उपाशी ठेवून, काठीने मारहाण करणाऱ्या आईच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना सांगवी परिसरात घडली.**



याबाबत पोलिसांच्या दामिनी पथकातील महिला पोलिसाने बुधवारी (९) याबाबत सांगवी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार तिच्या आईच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. ही घटना फेब्रुवारी 2025 ते 9 एप्रिल 2025 या कालावधीमध्ये सांगवी परिसरात घडली.


वरिष्ठ पोलीस निरीक्षक महेश बनसोडे यांनी दिलेल्या माहितीनुसार आरोपी महिलेने तिच्या अन्वय नावाच्या मुलाला मानसिक त्रास दिला. त्याच्या शरीराला चटके दिले. त्याला उपाशी ठेवून झाडूने व काठीने मारहाण मारत होती.

### असा झाला उलगडा

लहान मुलाच्या शरीरावरील चटके पाहून त्याच्या वर्ग शिक्षिकेने याबाबत त्याला विचारले. त्यानंतर आई करीत असलेल्या छळाची कहाणी त्याने सांगितली. त्यानुसार शाळेत गस्तीसाठी येत असलेल्या दामिनी पथकातील महिला पोलिसांना शाळेने ही बाब कानावर घातली. त्यानंतर माहितीची सत्यता पडताळून महिला पोलिसाने त्या मुलाच्या आईच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे.

“ अनेकदा शाळकरी मुलांच्या बाबतीत अशा घटना घडताना दिसून येतात. मुले त्यांच्याबाबत झालेल्या प्रकाराबाबत वाच्यता करत नाही. अनेक क्रूर प्रसंगांना या मुलांना सामोरे जावे लागते. अशा वेळेस सतर्क राहून प्रत्येकाने या मुलांना अशा प्रकारांपासून वाचवणे गरजेचे ठरते. या प्रकारातही शिक्षिकेच्या सतर्कतेमुळे संबंधित मुलाच्या बाबतची घटना समोर आली आहे.
**–महेश बनसोडे,** वरिष्ठ पोलीस निरीक्षक

## श्रीब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांची प्रवचने



### सर्वस्वी राहावे रामास अर्पण।

आता ऐका माझे वचन । मनाने व्हावे रामार्पण ॥ माझे नातेगोते एक राम । हा भाव ठेवून जावे रामास शरण ॥ अनन्य व्हावे भगवंती । जो कृपेची साक्षात् मूर्ति ॥ रामा आता करणे नाही उरले जाण । तुला आलो मी अनन्य शरण ॥

सुखदु:खाचा दाता । सत्य नाही दुजा आता ॥ जाणिवेने जैसे घ्यावे । तैसे मनाने सुखदु:ख भोगावे ॥ मी-माझेपणाची जोपर्यंत धडपड जाण । तोपर्यंत नाही समाधान ॥ सर्वस्वी राहावे रामास अर्पण । हाच उपाय सांगती साधुजन ॥

रामाला अर्पण व्हावे कोण्या रीती । त्याचा मार्ग सज्जन सांगती ॥ प्रयत्नेविण राहो नये । फळाची आशा ठेवू नये । भगवंताला विसरू नये । कर्तव्य या दृष्टीने कर्म करावे ॥ प्रथम राखावे भगवंताचे अधिष्ठान । तेथे व्हावा प्रयत्नाचा उगम ॥

अखंड राखावे अनुसंधान । येणे कर्म होईल सहज रामार्पण॥ वृत्ति राखावी अत्यंत शांत । हेच संताचे मुख्य लक्षण जाण ॥ जे जे घडेल काही । ते ते रामइच्छेने पाही॥ असा करावा संसार ।

परि असावे खबरदार । त्राता राम जाणुनी चित्ती । निर्भय करावी आपली वृत्ति। थोर भाग्य उदया आले । रामराय घरी आले । आता व्हावे रामाचे आपण। व्यवहार प्रपंच करावा जतन ॥ न दुज्याचा दोष पाहावा । त्याचा आपणापाशीच ठेवा ॥

देह आहे परतंत्र । मन राखावे भगवंताशी स्वतंत्र ॥ मनाने जो बांधला । परतंत्र वाटेल त्याला ॥ शरण गेला रामचरणी । त्याला नाही दुजी हानि ॥ अखंड करावे नामस्मरण । नीतिधर्माचे असावे आचरण ॥ बायकोमुले, लहान थोर । यांनी न सोडावा रघुवीर॥

काळ फार कठीण आला । बुद्धिभेद त्वरित झाला ॥ आता सांभाळावे सर्वांनी आपण । रामाविण न जाऊ द्यावा क्षण । चालले तसेच चालावे। राम ठेवील तसे असावे ॥ माझा राम जोडला हे जाणले ज्याने । त्याला न उरले करणे॥ राम ठेवील ज्या स्थितीत । त्यात समाधान मानावे॥ रामास जे करणे असेल। ते तो करील ॥ सदा सर्वकाळ माझ्याशी वास। हाच धरावा हव्यास॥ त्याला न जावे लागे कोठे। घरबसल्या राम भेटे॥ जो करी रामपदांबुजचिंतन । तयास नाही यमाचे बंधन॥

संताची सेवा केली । महद्भाग्य घरी आले॥ एका परमात्म्याशिवाय नाही कोणास शरण ॥ तोच खरा धन्य धन्य ॥ संताचे मर्जीने वागल्यास। कल्याण होईल खास॥

**बोधवचन:- अखंड राखावे अनुसंधान। येणे कर्म होईल सहज रामार्पण॥**

# मुस्लिमांनो, मुख्य प्रवाहात या.. संघाच्या चक्क हिरव्या पायघड्या!



**'स्टेट'मेंट**

**अधिकराव दिवे-पाटील**

संस्थापक, संपादक

**राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पूर्वी एवढा आता कडवा राहिलेला नाही. पूर्वीसारखे संघाचे हिंदुत्व देखील कट्टर राहिलेले नाही, हे मान्यच करावे लागेल. विशेषतः गेल्या काही दिवसात मुस्लिम समाजाबाबत संघातील ज्येष्ठ नेते जे काही बोलत असतात, त्याचे दूरगामी परिणाम दिसत आहेत. आता तर सरसंघचालक मोहन भागवत यांनी थेट मुस्लिमांनाच आवाहन केले असून मुख्य प्रवाहात येण्याबाबत हिरव्या पायघड्याचं घातल्या आहेत, असे म्हणायला हरकत नाही.**

### संघाची पावले विचारपूर्वकच !

सरसंघचालक मोहन भागवत जेव्हा एखादा मुद्दा मांडतात, तेव्हा तो विचारपूर्वक आणि संघाच्या 'कोअर ग्रुप' मध्ये झालेल्या प्रदीर्घ चर्चेनंतर तसेच विचार मंथनानंतरच मांडलेला असतो. आता तर, त्यांनी मुस्लिमांना बरोबर घेऊन राष्ट्र निर्मिती करा, असा मुद्दा मांडला आहे. संघाने एखादे पाऊल उचलले तर त्याकडे डोमकावळ्यासारखे लक्ष ठेवून बसलेले विरोधक खाडकन जागे होतात आणि टीकास्त्र सोडतात. संघावर टीका करण्याची एकही संधी सोडायची नसते, एवढीच त्यांना त्यांच्या संघटनांची शिकवण असते..प्रत्यक्षात त्याचा संघावर शून्य परिणाम झालेला असतो.

### सोशल मीडिया एकदम सक्रिय..

सरसंघचालकांचे शब्द बाहेर पडताक्षणी लगेचच सोशल मीडियावर स्वतःला हिंदुत्वाचे कैवारी समजणारे काही फेसबुकी हिंदू लगेचच त्यावर टोकाच्या विरोधी व वेड्यावाकड्या कॉमेंट टाकून मोकळे झाले. हिंदूंचे हित फक्त आपल्यालाच कळते, असा त्यांचा समज असावा. त्यांच्या भावनांचा आदर ठेवून त्यांच्या विचारार्थ माझ्या आकलनातील काही मुद्दे देत आहे. सर्व हिंदू बांधवानी जरूर वाचावेत आणि बिनधास्तपणे आपली मते नोंदविण्यास हरकत नाही.

### कोण म्हणतं सर्व मुस्लिम वाईट..

सर्व मुस्लिम समाज वाईट आहे, हा समज तद्दन खोटा आहे. वास्तव असे आहे, की सर्वसामान्य मुस्लिमांना भीती दाखवून आणि धार्मिक कट्टरता वाढवून,विशिष्ट मौलवी आणि राजकीय नेते आपल्या दबावाखाली ठेवत आले आहेत तसेच कायम ठेवू पाहात आहेत. त्यांना प्रचंड जबरदस्ती करून हिंदू विरोधी बनवण्याचा प्रयत्न सुरु आहे.



### मुस्लिमांचे तुष्टीकरण मतांसाठी !

मतांच्या फायद्यासाठी काँग्रेस, समाजवादी पार्टी, राष्ट्रीय जनता दल आणि महाराष्ट्रापुरते बोलायचे तर उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांचे गट, असे पक्ष या मौलाविना पूर्ण पाठिंबा देत आहेत. पण, त्यांच्या वागण्यातील विसंगती सर्वांच्या लक्षात येत आहे. त्यांची चाललेली तारेवरील कसरत ही फक्त मुस्लिमांच्या मतावर डोळा ठेवून आहे हे कोणाही कार्यकर्त्याच्या पटकन लक्षात येत आहे.

### काँग्रेसच्या काळातील चुकांची दुरुस्ती

पूर्वीच्या काँग्रेसच्या काळातील चुका पंतप्रधान नरेंद्र मोदी दुरुस्त करत आहेत. उदाहरणच द्यायचे तर तिहेरी तलाक, वक्फ बोर्डाचा कायदा ! त्याची जाणीव गोरगरीब सामान्य मुस्लिम, आणि त्यातही विशेष करून मुस्लिम महिलांमध्ये मोठ्या प्रमाणावर होत आहे.

### योजनांचा फायदा मुस्लिमांना..

मोदींच्या विकासकामांचा फायदा सर्वसामान्य मुस्लिमांना मिळतो आणि कळतो आहे. त्यामुळे प्रत्यक्षात कानोसा घेतला तर मुस्लिम मतदार सध्या संभ्रमात आहे. पण, हळूहळू भाजपा कडे वळत आहे. भाजपाच्या सरकारने उचललेल्या पावलांचे तो स्वागतही करीत आहे.

### विकसित राष्ट्राच्या दिशेने..

आपल्या देशाला जर प्रगत देश म्हणजेच विकसित राष्ट्र बनवायचे असेल तर ८० विरुद्धध वीस टक्के असा संघर्ष सुरु ठेवून ते शक्य होणार नाही. त्यासाठी देशांतर्गत पूर्ण एकी नाही, तरी सर्वसामान्य शांततेची परिस्थिती निर्माण करावीच लागेल. त्या पार्श्वभूमीवर मोहन भागवत आणि नरेंद्र मोदी यांची जशी नुकतीच भेट झाली, तशा भेटीतून धोरणे ठरत असतात आणि देशात तशी वातावरण निर्मिती केली जाते.. तशी पावले टाकली जातात.

### 'सौगात-ए-मोदी' चा धडाका..

यासाठी नुकत्याच झालेल्या 'सौगात-ए-मोदी' या बत्तीस लाख गरीब मुस्लिम बांधवांच्या घरी पोहचवण्यात आलेल्या भेटीचा संदर्भ लक्षात घ्या म्हणजे परिस्थिती लक्षात येईल. काँग्रेसच्या मुस्लिम तुष्टीकरण मॉडेल मध्ये मुस्लिम धर्मगुरु आणि प्रस्थापित मुस्लिम नेते केंद्रस्थानी होते. संघ आणि भाजपा च्या मुस्लिम सलोखा मॉडेल मध्ये सामान्य गरीब बांधव केंद्रस्थानी आहेत. फरक तर पडणारच आहे. त्यामुळे मुस्लिम समाज हा भाजपाकडे आकर्षित होत असल्याचे चित्र आहे आणि हेच मोहन भागवत आणि नरेंद्र मोदी यांना अपेक्षित आहे.

### संघर्ष नको, शांतता हवी !

आजच्या परिस्थितीत जमिनीवरच्या संघर्षाने जे शक्य होणार नाही, ते या प्रयत्नातून होईल, असा भाजपाच्या केंद्रीय नेतृत्वाचा विश्वास आहे. शेवटी हा पण एक प्रयत्न आहे, हे लक्षात ठेवायलाच हवे आणि येणारा काळच त्याचे यश ठरवणार आहे.

### साप साप करत भुई थोपटू नका..

सर्वसामान्य हिंदूंनी त्याला उगाचच विरोध न करता त्यात जमले तर सहकार्य द्यावे. अन्य हिंदूंचा बुद्धीभेद होईल, असा आक्रस्तळेपणा मुळीच करू नये. सर्वसामान्यांची बुद्धी ज्या ठिकाणी थांबते, त्यापुढे भागवत आणि मोदीही यांचे बुद्धी आणि नियोजन सुरू होते, हे लक्षात ठेवा. शिवाय कोणताही निर्णय घेण्यापूर्वी किंवा कोणतेही पाऊल उचलण्यापूर्वी पाठीमागे मोठाच्या मोठा 'थिंक टँक' बसलेला असतो हे सगळ्यांना माहीत आहेच!

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.

**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# धनंजय मुंडे औरंगजेबापेक्षा क्रूर!

## मी जे काही भोगलंय...; करुणा शर्मांचे गंभीर आरोप

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**राष्ट्रवादीचे नेते आणि माजी मंत्री धनंजय मुंडे आणि करुणा शर्मा यांच्याबाबतच्या खटल्यात महिना दोन लाख रुपये पोटगी देण्याचा निर्णय मुंबईतील माझगाव न्यायालयाने कायम ठेवला आहे. दोन मुलांना जन्म देणं हे एका घरात राहिल्याशिवाय शक्य नाही असंही न्यायालयाने म्हटलं आहे. यानंतर करुणा शर्मा यांनी माध्यमांशी संवाद साधला. तेव्हा धनंजय मुंडे औरंगजेबापेक्षा क्रूर व्यक्ती आहे असं मत व्यक्त केलं आहे.**



न्यायालयाने जो निकाल दिला त्याबद्दल मी न्यायाधीशांचे आभार मानते. खूप चांगली गोष्ट त्यांनी निकालात नमूद केली. आमदार किंवा मंत्र्याच्या पत्नीला तसंच राहणीमान असला पाहिजे. धनंजय मुंडे मला भेटला तेव्हा आम्ही विद्यार्थी होतो. त्याने संघर्ष केला तेव्हा मी माझी मालमत्ता विकली. दोनदा मंगळसूत्रही गहाण ठेवलं होतं. मी ते पैसे त्यांना (धनंजय मुंडे) दिले होते. मंत्री झाल्यानंतर ऐश करण्यासाठी तुम्ही बाजारु महिलांना ठेवत आहात. याचे माझ्याकडे पुरावे आहेत. मी त्याबाबत गप्प बसणार नाही. माझ्याशी जे वागलं गेलं ते क्रूर पद्धतीने ते वागले आहेत. न्यायाधीशांना सगळ्या गोष्टी माहीत नाहीत कारण मी सगळे पुरावे उघड केलेले नाहीत. माझ्या बहिणीचे व्हिडीओ, आईची आत्महत्या, मी विष प्यायलं होतं. या सगळ्या गोष्टी समोर आणणार आहे. असंमी ४५ दिवस तुरुंगात होते. इतका नीचपणा कुणीही संपूर्ण भारतात कधी केला नसेल. औरंगजेबही यांच्यापुढे (धनंजय मुंडे) फिका पडेल इतक्या नीच वृत्तीचे हे लोक आहेत. औरंगजेबाने त्याच्या पत्नीला तुरुंगात टाकलं नसेल. अत्यंत नीच प्रवृत्तीचे लोक आणि माझ्यासह जे २७ वर्षे त्यांनी घालवली तीदेखील क्रूर म्हणावी अशीच होती. दोन मुलांकडे बघून मी सहन करत होते. येत्या काळात मी सगळ्या गोष्टी बाहेर काढणार आहेत. यामध्ये फक्त धनंजय मुंडे नाहीत इतरही लोक आहेत की सगळ्यांना शिक्षा होणार आहे." असंही करुणा शर्मा यांनी म्हटलं आहे. एबीपी माझाशी बोलताना त्यांनी हे विधान केलं आहे. धनंजय मुंडेंच्या खोटारडेपणाला काही सीमा नाही, माझ्या नावावर २००३ मध्ये आम्ही घर खरेदी केलं होतं ते घर करुणा धनंजय मुंडे या नावावर होतं.

मात्र आता धनंजय मुंडे हे वकिलामार्फत जे कोर्टाला सांगत आहेत ते खोटं आहे. २००३ मध्ये धनंजय मुंडे कुठे आमदार होते?" असाही सवाल करुणा शर्मा यांनी विचारला आहे.न्यायालयाने जो निकाल दिला त्याबद्दल मी न्यायाधीशांचे आभार मानते. खूप चांगली गोष्ट त्यांनी निकालात नमूद केली. आमदार किंवा मंत्र्याच्या पत्नीला तसंच राहणीमान असला पाहिजे. धनंजय मुंडे मला भेटला तेव्हा आम्ही विद्यार्थी होतो. त्याने संघर्ष केला तेव्हा मी माझी मालमत्ता विकली. दोनदा मंगळसूत्रही गहाण ठेवलं होतं. मी ते पैसे त्यांना (धनंजय मुंडे) दिले होते. मंत्री झाल्यानंतर ऐश करण्यासाठी तुम्ही बाजारु महिलांना ठेवत आहात. याचे माझ्याकडे पुरावे आहेत. मी त्याबाबत गप्प बसणार नाही. माझ्याशी जे वागलं गेलं ते क्रूर पद्धतीने ते वागले आहेत. न्यायाधीशांना सगळ्या गोष्टी माहीत नाहीत कारण मी सगळे पुरावे उघड केलेले नाहीत. माझ्या बहिणीचे व्हिडीओ, आईची आत्महत्या, मी विष प्यायलं होतं. या सगळ्या गोष्टी समोर आणणार आहे. असंमी ४५ दिवस तुरुंगात होते. इतका नीचपणा कुणीही संपूर्ण भारतात कधी केला नसेल. औरंगजेबही यांच्यापुढे (धनंजय मुंडे) फिका पडेल इतक्या नीच वृत्तीचे हे लोक आहेत.

### मुंडेंच्या खोटारडेपणाला सीमा नाही

औरंगजेबाने त्याच्या पत्नीला तुरुंगात टाकलं नसेल. अत्यंत नीच प्रवृत्तीचे लोक आणि माझ्यासह जे २७ वर्षे त्यांनी घालवली तीदेखील क्रूर म्हणावी अशीच होती. दोन मुलांकडे बघून मी सहन करत होते. येत्या काळात मी सगळ्या गोष्टी बाहेर काढणार आहेत. यामध्ये फक्त धनंजय मुंडे नाहीत इतरही लोक आहेत की सगळ्यांना शिक्षा होणार आहे." असंही करुणा शर्मा यांनी म्हटलं आहे. त्यांनी हे विधान केलं आहे.धनंजय मुंडेंच्या खोटारडेपणाला काही सीमा नाही, माझ्या नावावर २००३ मध्ये आम्ही घर खरेदी केलं होतं ते घर करुणा धनंजय मुंडे या नावावर होतं. मात्र आता धनंजय मुंडे हे वकिलामार्फत जे कोर्टाला सांगत आहेत ते खोटं आहे.

# मंगेशकर कुटुंब माणुसकीला कलंक असलेलं

## तनिषा भिसे मृत्यू प्रकरणी विजय वडेट्टीवार यांची टीका

।मुंबई।
प्रतिनिधी : महाईन्यूज।

**पुण्यात तनिषा भिसे या गर्भवती महिलेचा मृत्यू झाल्याची घटना मागच्या आठवड्यापासून चर्चेत आहे. पुण्यातील नामांकित रुग्णालय अशी ओळख असलेल्या दीनानाथ मंगेशकर रुग्णालयावर या प्रकरणी हलगर्जीपणाचा आरोप होतो आहे. रुग्णालयाने उपचारांसाठी १० लाख रुपये अनामत रक्कम मागितली, ती न दिल्याने उपचारांना उशीर झाला आणि तनिषा भिसे दगावल्या असा आरोप होतो आहे.**



या प्रकरणानंतर महाराष्ट्रात राजकारण तापलं आहे. दरम्यान या प्रकरणाच्या चौकशीसाठी आरोग्य विभागाच्या समितीचा अहवाल समोर आला आहे. या अहवालात दीनानाथ मंगेशकरावर ठपका ठेवण्यात आला आहे. दरम्यान तनिषा भिसे यांच्या मृत्यू प्रकरणावरुन विजय वडेट्टीवार यांनी आता थेट मंगेशकर कुटुंबावर टीका केली आहे. लता मंगेशकर आणि संपूर्ण मंगेशकर कुटुंब माणुसकीला कलंक आहे असं म्हटलं आहे. तसंच यांनी कधी कुणाला दान केलं का? असाही सवाल वडेट्टीवार यांनी केला.तनिषा भिसे मृत्यू प्रकरण मी वाचतो आहे.

मंगेशकर कुटुंब म्हणजे लुटारुंची टोळी आहे. त्यांच्यापैकी कुणी कधी दान केलं आहे का? चांगलं गाणं म्हटलं म्हणून सगळ्यांनी मिरवलं. लतादीदी, आशादीदी, हे दीदी, ते दीदी यांनी लोकांसाठी आणि देशासाठी काय केलं? खिलारे पाटलांनी जमीन दिली त्यांना सोडलं नाही मंगेशकरांनी तर हे माणुसकीला कलंक आहेत असं मी म्हणतो. अशा पद्धतीने रुग्णालय चालवत असतील तर मंगेशकर कुटुंब कलंक आहेत." असं विजय वडेट्टीवार यांनी म्हटलं आहे.पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या हलगर्जीपणामुळे तनिषा सुशांत भिसे यांचा मृत्यू झाला.

या प्रकरणानंतर दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाच्या बाबतीत अनेक प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहेत. दरम्यान, तनिषा सुशांत भिसे यांच्या दोन मुलींचं सामाजिक भान ठेवून १८ व्या वर्षांपर्यंत मंगेशकर कुटुंबाने मातृत्व स्वीकारावं अशी मागणी भाजपा आमदार अमित गोरखे यांनी केली आहे. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयाचे काम पूर्वीपासून चांगलं आहे; पुढे ही ते असेच करत राहतील. परंतु, डॉ. घैसास यांच्याकडून चूक झाली. त्यांनी स्वतः राजीनामा दिला आहे. राजीनामा महत्त्वाचा नाही. डॉ. घैसास असतील किंवा इतर त्यांच्यावर गुन्हा दाखल झाला पाहिजे, अशी मागणी अमित गोरखे यांनी केली आहे.

### गोरखे यांनी काय मागणी केली?

पुढे ते म्हणाले, मंगेशकर कुटुंबीयांनी सामाजिक भान ठेवून त्या दोन मुलींचं मातृत्व १८ व्या वर्षांपर्यंत घेतलं पाहिजे. अशा घटनांमध्ये संस्था जबाबदार असते असं गोरखे यांनी म्हटलं आहे.पुण्यात तनिषा भिसे या गर्भवती महिलेचा मृत्यू झाल्याची घटना मागच्या आठवड्यापासून चर्चेत आहे.

# मला लहानपणी पूनम म्हणायचे!

## अमित शाह यांनी सांगितला टोपणनावामागचा किस्सा

। ओडिशा।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**लहानपणी प्रत्येकाला त्याच्या घरातले काहीतरी टोपण नावाने हाक मारत असतात. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनाही त्यांच्या लहानपणी टोपण नावाने हाक मारली जात होती. न्यूज१८ च्या रायजिंग भारत समिट २०२५ मध्ये अमित शाह यांनी लहानपणीच्या टोपण नावाचा किस्सा सांगितला आहे. "मी पाच वर्षांचा झाल्यानंतर माझ्या आत्याने मला व्यवस्थित नाव देण्याचा निर्णय घेतला. त्याआधी मला टोपण नावाने हाक मारली जात होती. माझा जन्म शरद पौर्णिमेला झाला होता, त्यामुळे मला लहानपणी सर्व पूनम म्हणून हाक मारत होते", असे गृहमंत्री अमित शाह म्हणाले.**



ग्रामीण भागात लहानपणी असे टोपण नाव देण्याची पद्धत प्रचलित आहे, असेही अमित शाह यावेळी म्हणाले.तसेच ११ वर्षांचे वय असताना कुटुंबातील लोक अमेरिकेला पाठविणार असल्यामुळे तुम्ही घरातून खरंच पळाला होता काय? असाही प्रश्न त्यांना विचारण्यात आला. त्यावेळी ते म्हणाले की, भारत सोडण्याची मला इच्छा नव्हती. तसे काही कारणही नव्हते. मी इथेच राहणार आणि संघर्ष करणार.न्यूज१८ च्या समिटमध्ये बोलत असताना अमित शाह म्हणाले की, मोदी सरकारच्या काळात आम्ही अनेक धाडसी निर्णय घेतले आहेत. वक्फ कायदा, सीएए, नक्षलवाद, ध्रुवीकरणाचे राजकारण आणि इतर अनेक विषयांवर काम सुरू आहे. "ध्रुवीकरणाची विचार विषारी आहेत. जे जे लोक ध्रुवीकरणाचे राजकारण करतात ते राष्ट्रविरोधी आहेत", असेही ते म्हणाले.

या मुलाखतीमध्ये अमित शाह यांनी भारताच्या फाळणीवरही टीका केली. तत्कालीन सत्ताधाऱ्यांमुळे देशाची फाळणी झाल्याचे ते म्हणाले. तसेच २०१३ साली लोकसभेच्या निवडणुका लागण्याच्या काही महिने आधी काँग्रेसने मतपेटीला चुचकारण्यासाठी वक्फ कायद्यात दुरूस्ती केली. आता नव्या विधेयकावर मुस्लीम समाजातील काही मूठभर नेते टीका करत आहेत. सर्वोच्च न्यायालयात १५ एप्रिल रोजी यावर सुनावणी होईल.तसेच संसदेत वक्फ विधेयकावर चर्चा करण्यासाठी पुरेसा वेळ देऊनही काँग्रेसच्या नेत्या प्रियांका गांधी आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी सभागृहात भूमिका मांडली नाही.काँग्रेससाठी हा मोठा विषय आहे, तर मग राहुल गांधी यांनी भाषण का केले नाही? एरवी राहुल गांधी आरोप करतात की त्यांना बोलू दिले जात नाही. वक्फ विधेयकावर त्यांच्या पक्षाला दिलेल्या संपूर्ण वेळेत ते कितीही बोलू शकले असते, अशी टीकाही अमित शाह यांनी केली. मुंबईवर २६/११ रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यातील प्रमुख आरोपी तहव्वूर राणाचे भारतात प्रत्यार्पण होत आहे, हे मोदी सरकारच्या मुत्सद्देगिरीचे मोठे यश आहे, असेही ते म्हणाले. ग्रामीण भागात लहानपणी असे टोपण नाव देण्याची पद्धत प्रचलित आहे, असेही अमित शाह यावेळी म्हणाले.तसेच ११ वर्षांचे वय असताना कुटुंबातील लोक अमेरिकेला पाठविणार असल्यामुळे तुम्ही घरातून खरंच पळाला होता काय? असाही प्रश्न त्यांना विचारण्यात आला. त्यावेळी ते म्हणाले की, भारत सोडण्याची मला इच्छा नव्हती. तसे काही कारणही नव्हते. मी इथेच राहणार आणि संघर्ष करणार.न्यूज१८ च्या समिटमध्ये बोलत असताना अमित शाह म्हणाले की, मोदी सरकारच्या काळात आम्ही अनेक धाडसी निर्णय घेतले आहेत.

### वक्फ कायद्यात दुरूस्ती केली

वक्फ कायदा, सीएए, नक्षलवाद, ध्रुवीकरणाचे राजकारण आणि इतर अनेक विषयांवर काम सुरू आहे. "ध्रुवीकरणाची विचार विषारी आहेत. जे जे लोक ध्रुवीकरणाचे राजकारण करतात ते राष्ट्रविरोधी आहेत", असेही ते म्हणाले. या मुलाखतीमध्ये अमित शाह यांनी भारताच्या फाळणीवरही टीका केली. तत्कालीन सत्ताधाऱ्यांमुळे देशाची फाळणी झाल्याचे ते म्हणाले. तसेच २०१३ साली लोकसभेच्या निवडणुका लागण्याच्या काही महिने आधी काँग्रेसने मतपेटीला चुचकारण्यासाठी वक्फ कायद्यात दुरूस्ती केली. आता नव्या विधेयकावर मुस्लीम समाजातील काही मूठभर नेते टीका करत आहेत.

# धमक्या, ब्लॅकमेलनी चीन बधणारा नाही!

## चर्चेसाठी आमचेही दरवाजे खुले; चीन भूमिकेवर ठाम

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी २ एप्रिल रोजी जगातील ७० देशांवर समन्यायी आयातशुल्क लादले होते. मात्र त्यावर गदारोळ निर्माण झाल्यानंतर ट्रम्प प्रशासनाने बहुसंख्य देशांवरील आयातशुल्काला ९० दिवसांची स्थगिती दिली. मात्र चीनवरील आयातशुल्क १२५ टक्क्यांपर्यंत वाढवून व्यापारयुद्ध अधिक तीव्र केले. बुधवारी तातडीने ही शुल्कवाढ केल्यानंतर आता चीनकडूनही याला प्रत्युत्तर देण्यात आले आहे.**



गुरूवारी चीनच्या वाणिज्य मंत्र्यांनी वॉशिंग्टनशी चर्चा करण्यासाठी आम्ही तयार असल्याचे जाहीर केले. मात्र त्याआधी एकमेकांचा आदर राखत समान वागणूक द्यायला हवी, असे आवाहन त्यांनी केले.चीनच्या वाणिज्य मंत्रालयाचे प्रवक्ते हे योंगकियान यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, धमक्या आणि ब्लॅकमेल ही चीनशी व्यवहार करण्याची योग्य पद्धत होणार नाही.डोनाल्ड ट्रम्प यांनी एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात चीनसह सर्व देशांवर आयातशुल्क लादल्यानंतर चीनकडूनही तीव्र प्रतिक्रिया उमटली होती. चीनने अमेरिकन वस्तूंवर शुल्क लादल्याची घोषणा केली होती. त्यामुळेच बुधवारी अमेरिकेने बहुसंख्य देशांवरील आयातशुल्काला स्थगिती दिल्यानंतर चीनवरील आयातशुल्क १२५ टक्क्यांपर्यंत वाढविला.३ एप्रिल रोजी अमेरिकेने चीनवर ३४ टक्के आयातशुल्क लादले होते. दुसऱ्या दिवशी चीननेही अमेरिकन वस्तूंवर ३४ टक्के आयातशुल्क लादण्याची घोषणा केली. चीनच्या या निर्णयावर डोनाल्ड ट्रम्प यांनी नाराजी व्यक्त केली. चीनचा हा निर्णय चुकीचा असल्याचे ते म्हणाले. ट्रम्प यांनी ट्रूथ या सोशल नेटवर्किंग साईटवर लिहिले की, चीनने मोठी चूक केली आहे. ते बिथरले असून ही चूक त्यांना परवडणारी नाही. त्यानंतर या आठवड्यात मंगळवारी अमेरिकेने चीनवर १०४ टक्के अतिरिक्त आयातशुल्क लावले. अमेरिकेच्या आक्रमक भूमिकेनंतर चीननेही त्याला जशास तसे उत्तर देत अमेरिकेच्या मालावरील आयातशुल्क ३४ टक्क्यांहून वाढवत ८४ टक्के केले. १० एप्रिलपासून याची अंमलबजावणी सुरू झाली.गेल्या वर्षी दोन्ही देशांत मिळून एकूण ५८५ अब्ज डॉलरचा व्यापार झाला. पण यात अमेरिकेतून चीनमध्ये होणाऱ्या निर्यातीचे मूल्य १४५ अब्ज डॉलर इतके आहे. याउलट चीनकडून अमेरिकेला होणारीचे निर्यातीचे मूल्य ४४० अब्ज डॉलर इतके आहे. म्हणजे २९५ अब्ज डॉलरचे आधिक्य (सरप्लस) चीनकडे आहे. तितकीच तूट (डेफिसिट) अमेरिकेकडे आहे.

### दोन्ही देशांतील व्यापार किती?

गुरूवारी चीनच्या वाणिज्य मंत्र्यांनी वॉशिंग्टनशी चर्चा करण्यासाठी आम्ही तयार असल्याचे जाहीर केले. मात्र त्याआधी एकमेकांचा आदर राखत समान वागणूक द्यायला हवी, असे आवाहन त्यांनी केले.पत्रकार परिषदेत सांगितले की, धमक्या आणि ब्लॅकमेल ही चीनशी व्यवहार करण्याची योग्य पद्धत होणार नाही.

# 310 कोटींचे बजेट अन् फ्लॉप ठरलेला चित्रपट

एखादा नवीन चित्रपट आला आणि त्याचे रिव्ह्यू चांगले असतील, सगळीकडे चर्चा होत असेल तर अनेकजण तो चित्रपट पाहायला आवर्जून जातात. दर आठवड्याला अनेक चित्रपट रिलीज होतात, काही फ्लॉप होतात तर काही हिट होतात. हिट चित्रपट पाहायला अनेकांना आवडतं. मात्र काही लोकांना फ्लॉप चित्रपट पाहण्याची आवड असते. असाच एक बॉलीवूड चित्रपट आहे, जो चित्रपटगृहांमध्ये फ्लॉप झाला. तो आता ओटीटीवर उपलब्ध आहे. तुम्ही दर आठवड्याला ओटीटीवर येणार नवनवीन सिनेमे पाहत असाल. पण हा चित्रपट सात वर्षांपूर्वी आला होता. खरं तर या चित्रपटात तगडी स्टारकास्ट होती. निर्मात्यांनी तब्बल ३१० कोटी रुपये



खर्च करून त्याची निर्मिती केली होती. पण या चित्रपटाकडे प्रेक्षकांनी पाठ फिरवली. या चित्रपटाचे नाव आहे 'ठग्स ऑफ हिंदोस्तान'. आमिर खानचा हा चित्रपट बॉलीवूडमधील सर्वात मोठ्या फ्लॉप सिनेमांपैकी एक आहे.सात वर्षांपूर्वी २०१८ मध्ये हा चित्रपट रिलीज झाला. ट्रेलर आल्यापासून चित्रपटाबद्दल नकारात्मक पसरली होती. आमिर खान व अमिताभ बच्चन असे दोन दिग्गज मुख्य भूमिकेत असूनही कथा दमदार नसल्याने प्रेक्षकांनी चित्रपट नाकारला. व्हीएफएक्स व ग्राफिक्सचा सिनेमात खूप वापर करण्यात आला होता.या चित्रपटात १७९५ चा काळ दाखवण्यात आला होता. तेव्हा भारताला हिंदुस्थान म्हटलं जायचं. तर भारतीय बँडिट्सना ठग्स म्हटलं जायचं. कंटेंट चांगला नसेल तर कितीही खर्च करून चित्रपटाची निर्मिती केली असेल आणि कितीही मोठे स्टार्स असतील तरी चित्रपटाकडे प्रेक्षक पाठव फिरवतील हे 'ठग्स ऑफ हिंदोस्तान'ने सिद्ध केलं. या चित्रपटाचे दिग्दर्शन विजय कृष्णा आचार्यने केलं होतं. तब्बल ३१० कोटी रुपयांच्या बजेटमध्ये तयार झालेला हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर सपशेल आदळला. भारतात त्याने फक्त १५१.३० कोटींचे कलेक्शन केले होते. आणि जगभरातील कलेक्शन ३२७ कोटी रुपये होतं.

# नम्रताने शेअर केला बहिणीचा जुना फोटो



आज जगभरात वर्ल्ड सिबलिंग डे साजरा केला जात आहे. सामान्यांपासून ते सेलिब्रिटीपर्यंत सर्वजण आपापल्या भावंडांबरोबरचे फोटो सोशल मीडियावर शेअर करताना दिसत आहेत. त्यांच्याप्रति प्रेम व्यक्त करताना दिसत आहेत. वर्ल्ड सिबलिंग डे निमित्ताने अनेकजण भावना व्यक्त करताना दिसत आहे. आता अभिनेत्री नम्रता शिरोडकर ने बहिणीबरोबरचे जुने फोटो शेअर करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले आहे नम्रता शिरोडकर आणि शिल्पा शिरोडकर या दोन बहिणींमधील बॉण्डिंग कायमच चाहत्यांचे लक्ष वेधून घेताना दिसते. अनेकदा शिल्पा शिरोडकर बहीण नम्रताबरोबरचे फोटो सोशल मीडियावर शेअर करताना दिसते. तर नम्रतादेखील शिल्पाबरोबरचे काही खास क्षण सोशल मीडियावर शेअर करताना दिसते. आता वर्ल्ड सिबलिंग डे निमित्ताने नम्रता शिरोडकरने शेअर केलेल्या फोटोंमध्ये दोघीही पारंपारिक वेशभूषेत दिसत आहेत. दोघींनीही साडी नेसली असून त्यावर सोन्याचे दागिने घातले असल्याचे दिसत आहेत. नम्रताने गुलाबी आणि हिरव्या रंगाची साडी नेसली असून शिल्पाने सोनेरी रंगाची साडी नेसली आहे.

# गौहर खान 41 व्या वर्षी दुसऱ्यांदा होणार आई

बॉलीवूड चित्रपट, हिंदी मालिकांमध्ये काम करून लोकप्रियता मिळवणारी अभिनेत्री गौहर खान हिने गुड न्यूज दिली आहे. गौहर दुसऱ्यांदा आई होणार आहे. तिने पतीबरोबरचा एक व्हिडीओ इन्स्टाग्रामवर पोस्ट केला हा. या व्हिडीओत ती बेबी बंप फ्लॉंट करताना दिसतेय. गौहर खान आणि तिचा पती झैद दरबार लवकरच त्यांच्या दुसऱ्या मुलाचे स्वागत करणार आहेत. डिसेंबर २०२० मध्ये लग्न करणाऱ्या या जोडप्याने पुन्हा आई-बाबा होणार असल्याची घोषणा केली आहे. लग्नानंतर चार वर्षांनी गौहर दुसऱ्यांदा आई होणार आहे. गौहर आणि जैदने त्यांच्या सोशल मीडियावर एक क्यूट व्हिडिओ शेअर केला आहे. यात दोघेही एकत्र नाचताना आणि मस्ती करताना दिसत



आहेत. शेवटी गौहर बेबी बंप फ्लॉंट करते व दोघेही पोज देतात.४१ वर्षांच्या गौहरने ही आनंदाची बातमी दिल्यावर चाहत्यांनी आणि इंडस्ट्रीतील जवळच्या लोकांनी कमेंट्समध्ये तिच्यावर प्रेमाचा वर्षाव केला आहे. "तुमच्या प्रार्थना व प्रेमाची गरज आहे. गाझा बेबी २", असं कॅप्शन गौहरने व्हिडिओला दिलं आहे.गौहर खान आणि झैद दरबार यांनी दुसऱ्या बाळाबद्दल आनंदाची बातमी शेअर करताच कमेंट्स सेक्शनमध्ये चाहते व सेलिब्रिटींच्या मेसेजेसचा पूर आला आहे. अनेकांनी गौहर व झैदचं अभिनंदन केलं आहे. त्यांच्या बाळासाठी आशीर्वाद दिले आहेत, तसेच काहींनी हार्ट इमोजी कमेंट केल्या आहेत. गौहर खान व झैद दरबार यांनी काही काळ डेट केल्यावर २५ डिसेंबर २०२० रोजी मुंबईत लग्न केलं होतं. करोना काळात या जोडप्याने त्यांच्या जवळच्या लोकांच्या उपस्थितीत एका खासगी सोहळ्यात लग्न केलं होतं. गौहर पती झैदपेक्षा तब्बल १२ वर्षांनी मोठी आहे. लग्नानंतर त्यांनी १० मे २०२३ रोजी त्यांचा मुलगा जेहानचे स्वागत केले. गौहर व झैद सोशल मीडियावर खूप सक्रिय आहेत आणि त्यांच्या आयुष्याशी संबंधित प्रत्येक अपडेट चाहत्यांबरोबर शेअर करत असतात.

# वयाच्या ६७व्या वर्षीदेखील सनी देओलची जबरदस्त एनर्जी

सनी देओल सध्या 'जाट' चित्रपटामुळे खूप चर्चेत आहे. आज सनी देओलचा हा बहुचर्चित व बहुप्रतीक्षित चित्रपट प्रदर्शित झाला आहे. 'जाट' चित्रपटाला प्रेक्षकांच्या चांगला प्रतिसाद मिळताना दिसत आहे. दोन वर्षांनंतर सनी देओलने 'जाट' चित्रपटाच्या माध्यमातून बॉलीवूडमध्ये पुनरागमन केलं आहे. 'जाट'च्या प्रदर्शनापूर्वी अभिनेता राजस्थानच्या तनोट मातेच्या मंदिरात दर्शनासाठी गेला होता. याचे फोटो, व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. 'जाट' चित्रपटाला यश मिळण्यासाठी सनी देओलने तनोट मातेचे आशीर्वाद घेतले. या मंदिरातील मातेला 'सैनिकांची देवी' म्हटलं जात. भारत-पाकिस्तान सीमा रेषेवरील हे शेवटचं हिंदू मंदिर आहे. या मंदिरातील मातेचे आशीर्वाद घेतल्यानंतर सनी देओल बीएसएफच्या जवानांबरोबर थिरकताना पाहायला मिळाला. याचा व्हिडीओ सध्या सोशल मीडियावर खूप चर्चेत आला आहे.'एएनआय' या वृत्तसंस्थेने सनी देओलच्या डान्सचा व्हिडीओ शेअर केला आहे. ज्यामध्ये सनी



स्वतःच्या चित्रपट 'गदर'मधील सुपरहिट गाणं 'मैं निकला गड्डी लेके'वर डान्स करताना दिसत आहे. हे गाणं जवान गाताना पाहायला मिळत आहे. तसंच सनीबरोबर बीएसएसएफचे जवान थिरकताना दिसत आहेत.दरम्यान, सनी देओलचा 'जाट' चित्रपटाआधी २०२३मध्ये 'गदर २' प्रदर्शित झाला होता. हा चित्रपट ब्लॉकबस्टर ठरला होता. २०२३मधील देशातील सर्वाधिक कमवणारा चित्रपट 'गदर २' होता. सॅकनिल्कच्या माहितीनुसार, 'गदर २' चित्रपटाने देशभरात ५२५.७ कोटींचा व्यवसाय केला होता. तर जगभरात ६८६ कोटींची गल्ला जमवला होता. त्यामुळे 'गदर २' प्रमाणे सनी देओलच्या 'जाट' चित्रपटाला प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद मिळेल, असा अंदाज वर्तवला होता.राजस्थानच्या तनोट मंदिराचं सनीच्या 'बॉर्डर' चित्रपटाशी खास कनेक्शन आहे. या मंदिराची झलक 'बॉर्डर' चित्रपटात दाखवण्यात आली होती. १९७१ साली भारत-पाकिस्तान युद्धादरम्यान तनोट माता मंदिरावर गोळीबार झाला होता. ही घटना 'बॉर्डर' चित्रपटात दाखवण्यात गेली होती. या चित्रपटात सनी देओलने मेजर कुलदीप सिंह चांदपुरीची मुख्य भूमिका साकारली होती.सनीच्या 'जाट' चित्रपटाबद्दल बोलायचं तर, या चित्रपटातील बरेच सीन कापण्यात आले आहेत. एकूण २२ बदल करण्यात आले आहेत. यामध्ये शिव्या, अपशब्दांसह बरेच हिंसक सीन्स होते, जे आता बदलण्यात आले.

# दिल्लीचा सलग चौथा विजय!

## दिल्लीच्या संघाने बंगळुरू संघाकडून विजय हिसकावून घेतला

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**केएल राहुलचा विजयी षटकार आणि दिल्लीने आरसीबीचा ६ विकेट्सने विजय मिळवला. आरसीबीने कमालीच्या गोलंदाजीवर सामना आपल्या बाजूने वळवला होता, पण केएल राहुल आपल्या खेळीच्या जोरावर संघाला दणदणीत विजय मिळवून दिला. राहुल या सामन्यात चौथ्या क्रमांकावर फलंदाजी आला होता. राहुलने ५३ चेंडूत ७ चौकार आणि ६ षटतकारांसह ९३ धावा करत नाबाद परतला. तर ट्रिस्टन स्टब्सने त्याला ३८ धावा करत चांगली साथ दिली.**



आरसीबीने प्रथम फलंदाजी करताना १६३ धावा केल्या होत्या. तर दिल्लीला विजयासाठी १६४ धावांचं लक्ष्य दिलं होतं. केएल राहुलच्या खेळीसह दिल्लीने १७.५ षटकांत १६९ धावा करत ६ विकेट्सने मोठा विजय नोंदवला. यासह दिल्लीने आयपीएलमधील एकाही सामन्यात पराभूत न होता सलग चौथा सामना जिंकला आहे.आरसीबीने प्रथम फलंदाजी करताना १६३ धावा केल्या होत्या. तर दिल्लीला विजयासाठी १६४ धावांचं लक्ष्य दिलं होतं. केएल राहुलच्या खेळीसह दिल्लीने १७.५ षटकांत १६९ धावा करत ६ विकेट्सने मोठा विजय नोंदवला. यासह दिल्लीने आयपीएलमधील एकाही सामन्यात पराभूत न होता सलग चौथा सामना जिंकला आहे.१६४ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दिल्लीची सुरुवात खूपच खराब झाली. फाफ डू प्लेसिसला यश दयालने फक्त २ धावांवर बाद केले. त्यानंतर भुवनेश्वर कुमारने जॅक फ्रेझर मॅकगर्क आणि अभिषेक पोरेल यांना स्वस्तात बाद केले. फ्रेझरने ६ चेंडूत ७ धावा केल्या. अभिषेक पोरेललाही फक्त ७ धावा करता आल्या. कर्णधार अक्षर पटेलही मोठी खेळी करू शकला नाही.३० धावांवर ३ विकेट गमावल्यानंतर अडचणीत सापडलेल्या दिल्लीला केएल राहुल आणि ट्रिस्टन स्टब्स यांनी उत्तम प्रकारे सावरलं. विशेषतः राहुलने मोक्याच्या क्षणी चांगली फलंदाजी केली आणि दिल्लीला पराभवातून बाहेर काढत चांगली फलंदाजी केली. क्रीजवर सेट झाल्यानंतर राहुलने आरसीबीच्या गोलंदाजांची चांगलीच धुलाई केली. राहुलने ३७ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले. राहुलने ५३ चेंडूत ९३ धावांची शानदार खेळी केली. त्याच्या खेळीदरम्यान, राहुलने ७ चौकार आणि ६ षटकार मारले. स्टब्सने २३ चेंडूत नाबाद ३८ धावा केल्या. राहुलने एक शक्तिशाली षटकार मारत दिल्लीला या हंगामात सलग चौथा विजय मिळवून दिला.

### केएल राहुल ठरला हिरो

ज्यामुळे आरसीबी २० षटकांत ७ गडी गमावून १६३ धावा करू शकला. गोलंदाजीत, कुलदीप यादवने मधल्या षटकांमध्ये एक शानदार स्पेल टाकला आणि फक्त १७ धावा देऊन दोन विकेट घेतल्या. त्याच वेळी, मोहित शर्मने १० धावा देऊन एक विकेट घेतली.आरसीबीने प्रथम फलंदाजी करताना १६३ धावा केल्या होत्या. तर दिल्लीला विजयासाठी १६४ धावांचं लक्ष्य दिलं होतं. केएल राहुलच्या खेळीसह दिल्लीने १७.५ षटकांत १६९ धावा करत ६ विकेट्सने मोठा विजय नोंदवला. यासह दिल्लीने आयपीएलमधील एकाही सामन्यात पराभूत न होता सलग चौथा सामना जिंकला आहे.आरसीबीने प्रथम फलंदाजी करताना १६३ धावा केल्या होत्या. तर दिल्लीला विजयासाठी १६४ धावांचं लक्ष्य दिलं होतं. केएल राहुलच्या खेळीसह दिल्लीने १७.५ षटकांत १६९ धावा करत ६ विकेट्सने मोठा विजय नोंदवला.

आरसीबीने नाणेफेक गमावत प्रथम फलंदाजीसाठी उतरला होता. आऱसीबीची सुरूवात एकदम दणक्यात झाली पण संघ मोठी धावसंख्या रचू शकला नाही. फिल सॉल्ट आणि विराट कोहली यांनी पहिल्या विकेटसाठी ३.५ षटकांत ६१ धावांची भागीदारी केली. सॉल्टने स्फोटक फलंदाजी करत १७ चेंडूत ३७ धावा केल्या. स्टार्कच्या एकाच षटकात सॉल्टने ३० धावा फटकावल्या, ज्याच्या मदतीने आरसीबीने फक्त ३ षटकात ५० धावा केल्या. त्याच वेळी, किंग कोहलीने १४ चेंडूत २२ धावा केल्या. त्यानंतर रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने ठराविक अंतराने विकेट गमावल्या आणि निम्मा संघ १०० धावांपर्यंत पोहोचण्यापूर्वीच बाद झाला.रजत पाटीदारने २३ चेंडूत २५ धावा केल्या. यानंतर शेवटच्या षटकांमध्ये, टिम डेव्हिडने जबाबदारी घेतली आणि वादळी फलंदाजी करत २० चेंडूत ३७ धावा केल्या.

---

# सॉल्टच्या रनआऊटचं खापर विराटच्या डोक्यावर!

## चाहत्यांनी कोहलीला सुनावलं; धावबादचे फोटो व्हायरल

। नवी दिल्ली ।
प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**आरसीबी वि. दिल्ली कॅपिटल्स सामना एम चिन्नास्वामी स्टेडियमवर खेळवला जात आहे. या सामन्यात आरसीबीच्या सलामी जोडीने वादळी फटकेबाजी करत ३ षटकात ५३ धावा केल्या. फिल सॉल्टने स्टार्कच्या एका षटकात ३० धावा कुटल्या होत्या. पण फिल सॉल्ट चौथ्या षटकात धावबाद झाला अन् आरसीबीच्या विकेट्सचा सिलसिला सुरू झाला.**





पण सॉल्टच्या या विकेटचं खापर चाहत्यांनी विराट कोहलीच्या डोक्यावर फोडलं आहे.विराट कोहली आणि फिल सॉल्ट यांनी आक्रमक फलंदाजी करत फक्त ३ षटकांत संघाची धावसंख्या ५० धावांच्या वर नेली. पण चौथ्या षटकाच्या पाचव्या चेंडूवर असं काही घडलं ज्यामुळे सामन्याचा रोख बदलला. विराट कोहलीच्या चुकीच्या कॉलमुळे फिल सॉल्ट धावबाद झाला. कोहलीच्या या चुकीमुळे चाहते खूप संतापले आहेत. यानंतर संघ पूर्णपणे डगमगला आणि एकामागून एक विकेट गमावल्या. एकेकाळी आरसीबी संघ एकही विकेट न गमावता ६१ धावांवर होता. पण पुढच्या १० धावा जोडताना संघाने तीन विकेट गमावल्या.अक्षर पटेल चौथे षटक टाकण्यासाठी आला होता. त्याच्या षटकाच्या पाचव्या चेंडूवर, सॉल्टने एक्स्ट्रा कव्हरवर शॉट खेळून धाव घेण्याचा प्रयत्न केला. सुरुवातीला, कोहलीनेही धाव घेण्यासाठी कॉल दिला आणि धावण्यास सुरुवात केली, पण मध्येच तो थांबला आणि सॉल्टला मागे वळावे लागले. दरम्यान, विपराज निगमच्या थ्रोवर केएल राहुलने बेल्स उडवल्या अन् सॉल्ट धावबाद झाला. सॉल्ट परत धावत जाताना मैदानावर घसरून पडला आणि वेळेत पोहोचू शकला नाही. सॉल्टच्या विकेटनंतर संघाने एकामागून एक तीन विकेट गमावल्या.समोर आलेल्या रेकॉर्डनुसार, आयपीएलच्या इतिहासात २४ वेळा असं घडले आहे की कोहलीचा जोडीदार त्याच्या चुकीमुळे धावबाद झाला आहे, तर विराट स्वतः ८ वेळा धावबाद झाला आहे.फिल सॉल्टला झेलबाद केल्यानंतर विराट कोहली मैदानावर असताना समोरचा खेळाडू धावबाद झाल्याचे काही फोटो शेअर केले आहेत. यामध्ये वनडे वर्ल्डकपमध्ये सूर्यकुमार यादव धावबाद झाला होता, दुसरा फोटो भारत वि. न्यूझीलंड दुसऱ्या कसोटीत ऋषभ पंत धावबाद झालेला.

### कोहलीच्या चुकीमुळे सॉल्ट धावबाद

तर तिसरा फोटो भारत वि. न्यूझीलंड दुसऱ्या कसोटीत स्वत: धावबाद झाला होता. तर चौथा फोटो बॉर्डर गावस्कर ट्रॉफीमधील यशस्वी जैस्वाल धावबाद झाला होता. याशिवाय इतर काही सामन्यांमधील रनआऊटचे फोटोही व्हायरल होत आहेत.अक्षर पटेल चौथे षटक टाकण्यासाठी आला होता.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज ™

ePaper

। शुक्रवार ।
। दि. 11 एप्रिल 2025।

epaper.mahaenews.com

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

# इलेक्ट्रिक सोलर व्हेईकल चॅम्पियनशिप'मध्ये पीसीसीओई अव्वल!

## शिक्षण विश्व: राष्ट्रीय पातळीवर पटकावला पहिला क्रमांक

। पिंपरी- चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज ।

**इलेक्ट्रिक सोलर व्हेईकल चॅम्पियनशिप (इएसव्हीसी) ३००० या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धेत पिंपरी चिंचवड कॉलेज ऑफ इंजिनिअरिंगच्या (पीसीसीओई) टीम सोलरियमने प्रथम क्रमांक पटकावला. ही स्पर्धा मार्च ते एप्रिल २०२५ दरम्यान ग्रेटर नोएडा येथे पार पडली.**



२०१६ मध्ये स्थापन झालेली टीम सोलरियम ही पीसीसीओईची अधिकृत सौरऊर्जेवर चालणारी इलेक्ट्रिक वाहनांची टीम आहे. शाश्वत वाहतूक तंत्रज्ञानात नाविन्य आणण्याच्या उद्देशाने सुरू झालेली ही टीम आज राष्ट्रीय स्तरावर नावलौकिक मिळविला आहे. सातत्यपूर्ण मेहनत, तांत्रिक कौशल्य आणि पर्यावरणपूरक दृष्टिकोन यांच्या बळावर त्यांनी हे यश संपादन केले आहे.

या स्पर्धेत टीम सोलरियमने देशभरातील नामांकित अभियांत्रिकी महाविद्यालयांशी स्पर्धा पीपल्स चॉईस पुरस्कार, सर्वोत्कृष्ट नाविन्य पुरस्कार, सर्वात हलकं वाहन पुरस्कार, सर्वोत्कृष्ट सहनशक्ती पुरस्कार, सर्वोत्कृष्ट इलेक्ट्रिकल सिस्टीम पुरस्कार या पुरस्कारांवर आपली मोहोर उमटवली.

या विजयामुळे पीसीसीओईने केवळ राष्ट्रीय स्तरावर आपली छाप उमटवली नाही, तर शाश्वत वाहतूक क्षेत्रातील नाविन्यपूर्ण कामगिरीत आघाडीवर असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध केले, अशी भावना पीसीईटी विश्वस्त मंडळाने व्यक्त केली.

पीसीईटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्षा पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त तथा पीसीयुचे कुलपती हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी विजयी संघाचे अभिनंदन केले.

या संघाला पीसीसीओईचे संचालक डॉ. गोविंद कुलकर्णी, उपसंचालक डॉ. निलकंठ चोपडे, अधिष्ठाता डॉ. पद्माकर देशमुख, मार्गदर्शक प्रा. डॉ. जया गोयल तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापकवर्ग आणि कर्मचाऱ्यांचे मार्गदर्शन व पाठबळ लाभले.

# खेलो इंडिया प्रकल्पात युवा खेळाडूंनी सहभागी व्हावे!

## पद्मश्री पेटकर : विजय नखाते यांच्या मार्गदर्शनाखाली भैरवनाथ तालीम मध्ये 2100 दिवे लावून केला जागतिक विक्रम


। पिंपरी। प्रतिनिधी महाईन्यूज ।

**भारतीय खेळाडूंना ऑलिम्पिक मध्ये पदके मिळवायची असतील, तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या "खेलो इंडिया" या प्रकल्पातून जास्तीत जास्त युवा खेळाडूंनी सहभाग घेऊन आपली क्षमता सिद्ध केली पाहिजे. यातून पुढे आलेले खेळाडू जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय स्तरावर खेळून अनुभव मिळवतील. हा अनुभव, सराव आणि योग्य प्रशिक्षक, मार्गदर्शकाच्या सल्ल्याने खेळाडूंना नक्की यश मिळेल.**



पै. विजय नखाते यांच्या मार्गदर्शनाखाली झालेला जागतिक विक्रम इतर खेळाडूंना प्रेरणादायी आहे असे प्रतिपादन पद्मश्री मुरलीकांत पेटकर यांनी केले. गुरुवारी (दि. १० एप्रिल ) रहाटणी, ता. हवेली, जि. पुणे येथील भैरवनाथ तालीम येथे पै. विजय नारायण नखाते यांच्या नेतृत्वाखाली आखाड्यामध्ये एकाच वेळी २१०० तेलाचे दिवे प्रज्वलित करून जागतिक विक्रम करण्यात आला. या विक्रमाची नोंद "इंटरनॅशनल वर्ल्ड रेकॉर्ड" मध्ये घेण्यात आली. त्याचे प्रमाणपत्र पद्मश्री मुरलीकांत पेटकर यांच्या हस्ते पै. विजय नखाते यांना देण्यात आले.

यावेळी ऑलिम्पिक वीर पै. मारुती आडकर, अर्जुन पुरस्कार गोपाळ देवांग, राष्ट्रीय खेळाडू राजाराम पाटील, आण्णा शेलार, संतसेवक बाळासाहेब वाघेरे, जावळे महाराज, ज्ञानेश्वर कोकणे, युवा महाराष्ट्र केसरी पै. किशोर नखाते, प्रशिक्षक भाऊसाहेब लांडगे, कपिल मिसाळ, युवा कीर्तनकार संतोष महाराज काळोखे, संदीप महाराज जाधव, सुनील कुंजीर, रहाटणी व परिसरातील ग्रामस्थ, नागरिक व युवा खेळाडू उपस्थित होते. ऑलिम्पिक वीर पै. मारुती आडकर म्हणाले की, पद्मश्री मुरलीकांत पेटकर यांच्यासारखे उत्तुंग व्यक्तीमत्व पुन्हा होणे नाही. तरुणपणात सैन्यात भरती होऊन वयाच्या ८४ व्या वर्षापर्यंत कार्यरत आहेत. पॅरा ऑलिम्पिक स्पर्धेत अनेक खेळात सुवर्णपदके आणि ब्रिटनच्या राणीकडून सन्मान मिळवणारे ते एकमेव भारतीय खेळाडू आहेत. त्यांचा आदर्श समोर ठेवून खेळाडूंनी सराव करून यश मिळवावे असे पै. आडकर म्हणाले.गोपाळ देवांग यांनी सांगितले की, मी ऑलिम्पिक आडकर यांना आणि पद्मश्री पेटकर यांना आदर्श मानून खेळात प्राविण्य मिळवले. खेळात नियमित सराव आणि आत्मविश्वास आवश्यक आहे. पै. विजय नखाते यांनी स्वागत करताना सांगितले की, आपल्या गावातील युवा पहिलवानांना मोठ्या दिग्गज खेळाडूंचा सहवास घडावा. त्याचबरोबर आपल्या भैरवनाथ तालीम चे नाव देशभर आदराने घेतले जावे, म्हणून २१०० तेलाचे दिवे एकाच वेळी प्रज्वलित करण्याचा जागतिक विक्रम केला आहे. या विक्रमाचे मिळालेले प्रमाणपत्र मी आदराने भैरवनाथ महाराज चरणी समर्पित करतो. इंटरनॅशनल वर्ल्ड रेकॉर्डचे सीइओ आयुष गुप्ता, राष्ट्रीय उपाध्यक्ष दीपक हरके आणि ब्रँड ॲम्बेसीडर ईशा अगरवाल यांच्या मार्गदर्शनाखाली हा जागतिक विक्रमाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.


Moaraya Shikshan Sanstha
Computer Vacation Batch
2024-25
ADMISSION OPEN
Second Batch
From 5th April 2025
Duration One Month
1 Hour /day
Monday to Saturday
For
10th std Students,
12th std students,
parents,
others school students
'C' Language
Fees: 1300/-
Corel Draw
Fees: 1100/-
'C++' Language
Fees: 1300/-
Adobe Photoshop
Fees : 1100/-
Basic Java
Fees : 1300/-
Basic Tally
Fees : 1500
Scratch Animation
Fees : 1300/-
M.S. Office
Fees : 1500/-
Contact: 8087706100/ Computer Lab
Registration started
Venue: Computer Lab, V. K. Mate Highschool


Priyadarshani
SCHOOL & JR. COLLEGE
ALANDI
2025-26
ADMISSIONS
OPEN
PRIYADARSHANI
SCHOOL, ALANDI
42 YEARS OF ENRICHING EXPERIENCE IN EDUCATION
50 FIFTY PLUS NATIONAL & INTERNATIONAL AWARDS ACROSS SCHOOLS
Contact Us Now
86687 55826
98232 31705
Wadgoan road, Sr.no. 98,
Opposite Ram Mandir,
Alandi 412105


Late Babanrao Gabaji Gawali Charitable Trust's
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL & JUNIOR COLLEGE
Powered by
JAI HIND EDUTECH
CBSE Affiliation No. : 1130741 • UDISE Code - 27252001012
BHOSARI CAMPUS : Sr. No. 203, Nr. Durwankur Lawns, Alandi Road, Bhosari, Pune-411039 (Maharashtra)
SPG INTERNATIONAL PUBLIC SCHOOL
ADMISSION
OPEN
2025-2026
Pre Primary to Class XII
LIMITED SEATS
Hurry up!!!
Bi-focal / Technical / Vocational Subject are available
For Science Stream
• Computer Science
• Crop Science
• Electronics
• Mechanical / Technical Automobile
• Information Technology (IT)
For Commerce Stream
• Banking
• Marketing & Sales
• Office Management
• Small Industries & Self employment
• Information Technology (IT)
CALL NOW : 9763441639 / 8657473241


BLOSSOM YOUR KNOWLEDGE
PROUD PARENTS.
OUR BIGGEST
PRIDE.
ADMISSIONS OPEN FOR 2025-26
CBSE Curriculum, Aligned with NEP & NCF
Ambitious Projects like 'Read-to-Lead'
Legacy of 100% Results
Gayatri English Medium School & Jr. College
95277 64646 / 77967 67292
BRANCHES AT: CHARHOLI | MOSHI | DHANORE

KAMALA Education Society

KAMALA EDUCATION SOCIETY'S

# PRATIBHA INSTITUTE OF BUSINESS MANAGEMENT

**AICTE Permanent ID: 1-3675161 | DTE Code: 6167**

Approved by AICTE | B+ NAAC Accredited | Permanently Affiliated to Savitribai Phule Pune University

## ADMISSIONS OPEN

Full Time Undergraduate Courses (3 Years Degree Course, 4 Years Honours)



**BBA**

**Bachelor of Business Administration**



**BCA**

**Bachelor of Computer Applications**

### Highlights:

- Advanced Industrial and Research Learning
- Proven Track Record of Placements
- Mentoring and Seed Funds for Startups
- Skill Development and Certification Courses
- Live Industrial Projects
- Earn and Learn Scheme of Rs. 10,00,000+
- Govt. and Management Scholarships
- State of the Art infrastructure
- ICT enabled classrooms

Eligibility: Passed HSC Examination with any stream

**Call for more details:**

**BBA : Prof. Gururaj - 8624991767 | Dr. Pallavi - 9225635556**

**BCA : Prof. Manish - 9823223336 | Prof. Surabhi - 9049004895**

www.pibmpune.org.in

Scan QR code to know more


MASTER MIND GLOBAL SCHOOL & Jr. College
(CBSE)
( Since 2013)
ADMISSIONS OPEN FOR
NURSERY TO 12TH
Where There is Creativity, There is Master Mind
Excellence in Education & Disciplined Environment
Co-Curricular & Extra Curricular Activities
Guaranteed Safety & Security
7 STAR RANKING
Contact : +91 7218125125
E-mail : mastermindglobalschool.com
A++ Grade
In Leadership & Quality Management
Website : www.http://mastermindglobalschool.com